Kumbhar 18-19

# "Recent Trends in Language, Literature, Physical Education, Social Sciences And Commerce"

**9th Feb., 2019**

**Special Issue of**
**Multidisciplinary One Day International Seminar**

**Organized by**

The Bhogawati Shikshan Prasarak Mandal's

## Bhogawati Mahavidyalaya, Kurukali.

A/P Kurukali , Tal Karveer Dist.Kolhapur

**Editors**

**Dr.D.A. Chougale**

**Prof. Sagar R. Chougule**

**Dr.Arun Chavan**

**Special Issue No.47**

**Published by**
**Aayushi International Interdisciplinary Research Journal**
ISSN 2349-638x
Peer Review and Indexed Journal
Impact Factor 5.707
Website :- www.aiirjournal.com

| | | | |
|---|---|---|---|
| 85 | Dr. Mrs. Sunita Kale<br>Swati Suryakant Jawale | Effect Of Yoga And Pranayam Endurance On Bank Worker | 269 |
| 86 | Dr. Mrs. Sunita M.Kale<br>Miss. Jagtap tulasa Haribhau | Effects Of Suryanamaskara And Aasana On Strength Of Student | 272 |
| 87 | Dr.Mrs.Sunita M. Kale<br>Punam Vilas Yadav | Effects Of Suryanamaskara & Asana On Agility Of Players | 275 |
| 88 | Pravinkumar B. Lupane<br>Dr. Pratap Bhagwan Gaikwad | Challenges Before Indian Retail Industry | 278 |
| 89 | Dr. Pratap Bhagwan Gaikwad<br>Pravinkumar B. Lupane | Recent Trends in Indian Banking | 282 |
| 90 | Prof. Rupesh Lakshmanrao Deshmukh | Opportunities And Challenges For Banking Related With New Trends In Rural Parts Of Maharashtra State | 285 |
| 91 | Dr. Sandeep Kabir Dabhade | Bank Branch Expansion in India | 289 |
| 92 | प्रा. डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत | अलिप्ततावाद आणि भारतीय परराष्ट्र धोरणाची जडणघडण | 293 |
| 93 | डॉ. जयश्री गणपती कांबळे | 21 व्या शतकातील जगासमोरील आव्हाने | 296 |
| 94 | संजय बाळगोंडा खोत | शेतकरी आत्महत्या भारतासमोरील एक आव्हान | 298 |
| 95 | श्री. प्रविण चंद्रकांत कुंभार | शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोलीमधील मोबाईल आधारीत ग्रंथालयीन सेवा : एक अभ्यास | 302 |
| 96 | प्रा. राजश्री मनोहर बिसुरे | साठोत्तरी निवडक दलित नाटकातून आलेले श्रमप्रतिष्ठेचे चित्रण | 305 |
| 97 | श्री. रणजीत एकनाथ हसुरकर | महात्मा जोतीराव फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातील श्रम संस्कृतीचे चित्रण | 309 |
| 98 | प्रा. सविता सुर्यवंशी | 'ब–बळीचा' कादंबरीतील चित्रित झालेली ग्रामसंस्कृती | 311 |
| 99 | डॉ. मनोहर कोलासेकर | बखर वाङमय साधनावरून किल्ल्यांचे महत्व | 313 |
| 100 | डॉ.सुरेश एम.चव्हाण | ऐतिहासिक संशोधनाचे वास्तव : एक दृष्टिक्षेप | 318 |
| 101 | डॉ. निवासराव अधिकराव दरेकर | मराठ्यांच्या इतिहास लेखनातील डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांचे योगदान (1890–1962) | 320 |
| 102 | प्रा. एम. बी. थोरात | सबाल्टर्न इतिहासलेखन | 322 |
| 103 | प्रा.डॉ. सुभाष रामराव रगडे | उपेक्षितांच्या (Subaltern) इतिहासलेखनाची आवश्यकता | 326 |
| 104 | श्री. अंकुश रामचंद्र बनसोडे | भारतीय शेतीची उत्पादकता आणि हमीभाव संकल्पनेचा अभ्यास | 328 |
| 105 | डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते | भारतीय व महाराष्ट्रातील शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास | 331 |

# शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोलीमधील मोबाईल आधारीत ग्रंथालयीन सेवा : एक अभ्यास

श्री. प्रविण चंद्रकांत कुंभार
ग्रंथपाल

**प्रास्ताविक :**

आजच्या आधुनिक काळात ग्रामीण भागातील महाविद्यालयातील ग्रंथालये ही नवनवीन तंत्रज्ञान अवगत करण्याचा प्रयत्न करत आहेत. महाविद्यालय सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील वाघोली परिसरात अत्यंत दुर्मिळ, दुष्काळी भागात विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करत आहे. सदरच्या डोंगराळ भागात कोरेगाव एज्युकेशन सोसायटी कोरेगावचे शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स् कॉलेज वाघोलीची स्थापना 2001 साली झाली. सदर महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग हा विविध ग्रंथालयीन सेवा विद्यार्थ्यांना देत आहे. सदर सेवा देताना महाविद्यालयातील कोणताही विद्यार्थी हा शहरी भागामधील ग्रंथालयीन सेवांपासून वंचित राहू नये म्हणून सदर शहरी भागामधील सेवा ग्रंथालयात उपलब्ध करून देण्याचा अल्पसा प्रयत्न आमचे महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग सातत्याने करत आहे.

आजच्या संगणकाच्या युगात इंटरनेअच्या आधारे जग जवळ येत चालले आहे. डब्लु डब्लु डब्लु मुळे आज जगातील कानाकोपऱ्यातील माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहेत. सदर माहिती कमीतकमी वेळात संशोधकास मिळणे हे इंटरनेटच्या युगात शक्य झालेले आहे. सध्या मोबाईल फोनचा वाढता वापर ग्रंथालयाच्या दृष्टीने उपयोगी आहे. कारण ज्या वाचकांस घरातुन आपल्या कामातून वेळ काढून ग्रंथालयात येणे शक्य होत नाही. अशा वाचकांस आपण मोबाईल फोनच्या आधारे ग्रंथालयातील बऱ्याच सेवा उपलब्ध करून देवू शकतो. मोबाईल तंत्रज्ञानामुळे वाचकांस कोठेही, कोणत्याही क्षणी माहिती उपलब्ध होवू शकते. सदर लेखात शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स् कॉलेज वाघोलीमधील ग्रंथालयात मोबाईल आधारीत कोणत्या प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा देण्यात येतात याचा आढावा घेणार आहोत.

**की वर्ड** : मोबाईल, एसएमएस, ओपॅक, इंटरनेट, वाय–फाय, www इत्यादी.

**मोबाईल फोनच्या आधारीत ग्रंथालयीन सेवेचे फायदे :**

1. **वेळेची बचत**
2. **वैयक्तिक सेवा**
3. **माहिती वापरण्याची क्षमता**
4. **अमर्यादित वापर**

**वेळेची बचत :**

आजच्या माहितीच्या युगात माहिती प्रंचड प्रमाणात तयार होत आहे. त्याप्रमाणे ती उपलब्धही आहे. अशा माहितीमधून वाचकांस अचूक महिती कमीतकमी वेळात उपलब्ध करून देणे अवघड असते. पण सध्याच्या माहिती तंत्रज्ञानामध्ये मोबाईल सारख्या तंत्रज्ञानाचा वापर जर ग्रंथालयामध्ये केला तर वाचकांचा त्याच प्रमाणे ग्रंथालयीन सेवकांचाही वेळ वाचतो.

**वैयक्तिक सेवा :**

मोबाईलच्या आधारे जर ग्रंथालयातील माहिती वाचकांना पाठवित असेल तर ही सेवा थेट वाचकांस वैयक्तिकरित्या दिली जाते. त्यामुळे वाचकांच्या संशोधनांस चालना मिळते. ग्रंथालय आणि वाचकांमधील दुव्याचे काम मोबाईल करत असतो.

**माहिती वापरण्याची क्षमता :**

मोबाईलच्या आधारे ग्रंथालयीन सेवा हया वाचकांस कोठुनही, कधीही माहितीचा वापर करू शकतात. नेटवर्कच्या आधारे जगामधील कोणतीही माहिती वाचकांस एकाच ठिकाणी बसून वापर करू शकतात परीणामी संशोधनास चालना मिळते.

**अमर्यादीत वापर :**

ग्रंथालयातील माहिती वापरण्यास वेळेची बंधन असते. ग्रंथालय साधारणपणे सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 पर्यंत सुरू असते. त्याचप्रमाणे रविवारी सुट्टी असते. अशा वेळेस आपण माहितीचा उपयोग करू शकत नाही. परंतु जर मोबाईलच्या आधारे ग्रंथालयातील माहिती आपण अमर्यादित वापरू शकतो. त्यासाठी वेळेचे बंधन नाही.

❖ **शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स् कॉलेज वाघोलीमधील ग्रंथालयीन सेवा :**

1. **ऑनलाईन डाटाबेस**
2. **ओपॅक**
3. **एसएमएस सेवा**
4. **संदर्भसेवा**
5. **नवीन ग्रंथाची माहिती**
6. **वाय–फाय सेवा**

**ऑनलाईन डाटाबेस :** सध्या ग्रंथालय विभागामध्ये खालील डाटाबेस उपलब्ध आहेत.

अ. इन्फिबनेटचा एन लिस्ट डाटाबेस

ब. एन डी एल डाटाबेस

क. शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय डाटाबेस

सदर डाटाबेस हे ग्रंथालय विभागामार्फत युजर नेम व पासवर्डच्या आधारे वाचकांस उपलब्ध करून दिले जातात. महाविद्यालयातील विद्यार्थी सदर सेवेचा वापर ग्रंथालय विभागात येवून करतात. पण जर आपण मोबाईलचा वापर विद्यार्थी करत असतील तर त्यांना युजर नेम व पासवर्ड उपलब्ध करून दिले तर ती माहिती कोठेही बसून वापरू शकतात. सध्या महाविद्यालयातील विद्यार्थी हया सेवेचा उपयोग करतात.

**ओपॅक :** ग्रंथालय विभागात सध्या एनआयसीचे ई ग्रंथालय हे सॉफ्टवेअर वापरले जात आहे. सदर सॉफ्टवेअरच्या आधारे महाविद्यालयातील कॅम्पसमध्ये वाय–फायच्या आधारे वेब ओपॅक उपलब्ध करून दिलेला आहे. मोबाईलच्या आधारे विद्यार्थी वेब ओपॅकचा वापर करतात. त्यामध्ये महाविद्यालयातील सर्व पुस्तके, नियतकालिके उपलब्ध करून दिलेली आहेत.

**एस एम एस सेवा :** ग्रंथालय विभागामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेटच्या आधारे एस एम एस सेवा दिली जाते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील, ग्रंथालय विभागामधील सुचना पाठविल्या जातात.

**संदर्भ सेवा :** ग्रंथालय विभागामध्ये मोबाईलच्या आधारे वाचकांस ई–मेलच्या आधारे, एस एम एस च्या आधारे, आस्क अ लायब्ररीयनच्या आधारे माहिती मागू शकतात. अशा प्रकारची माहिती वाचकांना उपलब्ध करून दिली जाते.

**नवीन ग्रंथाची माहिती :** ग्रंथालय विभागात नवनवीन येणाऱ्या माहितीची कल्पना वाचकांना दिली जाते. त्यामध्ये ग्रंथाचा परीचय, ग्रंथाचे मुखपृष्ठ, ग्रंथाची अनुक्रमणिका वाचकांना पाठविल्या जातात.

**वाय–फाय सेवा :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील ऑनलाईन सुविधांचा लाभ घेता यावा यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत वाय–फाय सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

❖ **मोबाईल आधारीत ग्रंथालयीन सेवा देण्यामधील आव्हाने :**

सातारा जिल्हयामधील कोरेगाव तालुक्यातील डोंगराळ, दुर्मिळ, दुष्काळी भागामधील वाघोली याठिकाणी महाविद्यालय वसलेले आहे. सदर महाविद्यालय ग्रामीण भागामध्ये येत असल्याकारणामुळे ग्रंथालय विभागामध्ये मोबाईल सेवा देण्याचे ठरविले असले तरीपण काही आव्हानांना सामोरे जावे लागते. ती आव्हाने खालीलप्रमाणे आहेत.

1. **इलेक्ट्रिसिटीचा अभाव**
2. **इंटरनेट स्पिडचा अभाव**
3. **स्मॉल डिस्पे**
4. **लिमिटेड स्टोरेज**

5. नेटवर्कचा अभाव
6. विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती
7. इत्यादी

1. **इलेक्ट्रिसिटीचा अभाव** : सदर भागामध्ये इलेक्ट्रिसिटी ही सतत जात येत असते त्यामुळे जरी आपण ऑनलाईन सेवा देण्याचा विचार केला तरी मोबाईलची बॅटरी चार्जच नसेल तर आपण या सेवा कशा वापरणार आहोत. अशा साठी बॅटरी बॅकअपची सुविधा केली तरीपण बॅकअपसुध्दा रिचार्ज होण्याइतपत इलेक्ट्रिसिटी उपलब्धहोण्यामध्ये अडचणी येत असतात.
2. **इंटरनेटच्या स्पिडचा अभाव** : आजच्या आधुनिक काळातमध्ये 4 जी सुविधा शहरामधून उपलब्ध असताना आज ग्रामीण भागामधून आजही इंटरनेटचा 2 जीचाही स्पिड मिळत नाही. अशा स्पिड मुळे ग्रंथालयीन सेवेचा उपयोग करताना अडचणी येत आहेत.
3. **स्मॉल डिस्पे** : मोबाईलवर ग्रंथालयील सेवेचा वापर करताना आपणास मोबाईल डिस्पे हा बारिक असल्यामुळे वापरण्यासाठी अडचणी येतात. कामामध्ये गती येत नाही. तरीपण महत्वाच्या कामासाठी सदर स्मॉल डिस्पे मोलाची मदत करतात.
4. **लिमिटेड स्टोरेज** :मोबाईलवर काम करताना महत्वाची गरज भासते ती स्टोरेजची पण मोबाईलचा स्टोरेज हा लिमिटेड असतो परीणामी काममध्ये अडथळे येवू शकतात. पण कामाचे योग्य नियोजन केल्यास हया आव्हानाला आपण योग्य प्रकारे हाताळू शकतो.
5. **नेटवर्कचा अभाव** : महाविद्यालयाच्या परिसरामध्ये बऱ्याच कंपन्याच्या मोबाईलला नेटवर्क नाही आणि ज्यांना आहे त्यांना फुल नाही त्यामुळे मोबाईल सेवा वापरताना अडचणी येतात.
6. **विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती** : महाविद्यालय येणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्यांना ॲडव्हान्स मोबाईल वापरणे शक्य होत नाही परीणामी मोबाईलच्या आधारे ग्रंथालयीन सेवेमधील हे महत्वाचे आव्हान आहे.
7. **इत्यादी**

❖ निष्कर्ष :

आजच्या माहिती विस्फोटाच्या काळात अचूक माहिती कमीतकमी वेळात योग्य वाचकांस उपलब्ध करून दयायची असेल तर माहिती तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयामध्ये करणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागामधील विद्यार्थी शहरी भागामधील विद्यार्थ्यापेक्षा कोठेही कमी पडू नये म्हणून हा आमच्या ग्रंथालयाचा मोबाईल आधारीत सेवा देण्याचा अल्पसा प्रयत्न आहे. ग्रामीण भागामध्ये मोबाईल आधारीत सेवा देण्यामध्ये बरीच आव्हाने आहेत पण त्यावर उपाय शोधून नवनवीन माहिती वाचकांपर्यत माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपलब्ध करून देणे हे ग्रंथालयाचे महत्वाचे काम आहे.

काळाबरोबर ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी आपले ज्ञान अवगत करून अशा सेवा दिल्या पाहिजेत तरच आपण जगाच्या पाठीवर टिकु शकणार आहोत.

❖ संदर्भ :

1. विद्यानगरी महाविद्यालय वार्षिक अंक 2015
2. Vishwakarma, M. L. (2013) Use of mobile and wireless technology in Indian Libraries, *International Journal of Engineering and Computer Science*,2(6),*1799-1805*. Retrieved from: h ttp://ijecs.in/issue/v2-i6/10%20ijecs .
3. https://www.researchgate.net/publication/271906602_Mobile_Based_Services_Application_and_Challenges
4. https://egranthalaya.nic.in/
5. Malathy S and Kantha P. Application of Mobile Technologies to Libraries. DESIDOC Journal of Library & Informaton Technology. 2013 (Sept);33(5): 361-366.
6. Sudhir Ramdas Nagarkar. Use of Mobile Technology in Library services. Indian Streams Research Journal. 2011 (Dec); 3(11): 1-4 ISSN No : 2230- 7850.